<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी यादी</u>

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**प्रकल्प अधिकाऱ्यास अधिकार नसताना प्रशासकाची नेमणूक केल्याबाबत**

**(१) ५८६० (१७-०४-२०१५). श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साळवाडी (ता.मोकर, जि.नांदेड) येथील आश्रम शाळेवर प्रशासक नेमण्याचे अधिकार नसताना प्रकल्प अधिका-याने प्रशासकाची नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्प अधिका-यास अधिकार नसताना प्रशासकाची नेमणूक केल्याप्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१०-११-२०१६) :** (१), (२) व (३) सदर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी दिनांक १५/८/२०१४ रोजी संस्थाचालक व मुख्याध्यापक यांचेकडे आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या मागण्या केल्या. तथापि संस्थाचालक व मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांच्या समस्या व मागण्या ऐकूण घेतल्या नाहीत. या अनुषंगाने दिनांक १६/८/२०१४ रोजी सहाय्यक प्रकल्प अधिकारी यांनी चौकशीसाठी शाळेला भेट दिली. चौकशी चालू असतांना विद्यार्थी व पालकांनी शाळा व संस्था चालक यांचेविरुध्द तिव्र आंदोलन केले. परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेवून संस्थेने शाळेचे मुख्याध्यापक व अधिक्षक यांना निलंबित केले.

पुढे दिनांक १६ ते २५/०८/२०१४ कालावधीत एकही विद्यार्थी शाळेत न आल्याने व या संदर्भात करण्यात आलेल्या चौकशीत अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या. त्यामुळे शाळा पुर्ववत सुरु करुन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी शाळेवर प्रशासकांची नेमणूक करण्यात आली. त्यानंतर अपर आयुक्त, अमरावती यांच्या दिनांक ७/२/२०१५ च्या आदेशान्वये प्रशासकाची नेमणूक रद्द करुन शाळा पूर्ववत संस्थेच्या ताब्यात देण्यात आली.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या कल्याणासाठी**
**अनुसूचित जाती उपयोजना राज्यात राबविण्याबाबत**

**(२) १२९७६ (२२-१२-२०१५). श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या कल्याणासाठी अनुसूचित जाती उपयोजना राज्यात राबविण्यात येत असून राज्याच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद करण्याचे शासनाचे धोरण असून त्यानुसार अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१२-२०१३, २०१३-१४, २०१४-१५ या गत तीन वर्षात अनुसूचित जातीच्या उपयोजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या निधीचा पूर्णपणे यासाठी वापर करण्यात आलेला नसून त्यापैकी काही निधी अन्यत्र वळविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील तीन वर्षात वर्षनिहाय अर्थसंकल्पात किती आर्थिक तरतूद करण्यात आली होती, त्यापैकी प्रत्यक्षात या योजनेवर किती निधी खर्च करण्यात आला, उर्वरित निधी या योजनेवर खर्च न करण्याची कारणे काय आहेत व निधी अन्यत्र वळविण्यात आला, त्याची कारणे व तपशील काय आहे,
(४) असल्यास, या योजनेचा निधी अन्यत्र वळविण्यात येऊ नये यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०७-११-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.

(३) व (४)

| सन | मंजूर नियतव्यय | अर्थसंकल्पीय तरतूद | प्राप्त तरतूद | खर्च |
|---|---|---|---|---|
| २०१२-१३ | ४५९०.०० | ४५२५.४४ | ३६४८.८७ | ३२३६.५९ |
| २०१३-१४ | ५०१८.६३ | ५०२८.८२ | ३७६०.०० | ३५६३.११ |
| २०१४-१५ | ६०७०.२९ | ५२४६.७५ | ३७३१.९१ | ३३९४.१० |

अनुसूचित जाती योजना निधी अन्यत्र वळविण्यात येत नाही.

---

**नांदेड शहरात मोकाट जनावरांचा नागरिकांना त्रास होत असल्याबाबत**

**(३) १३१७० (२३-१२-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरात छत्रपती चौक, तरोडा नाका, भाग्यनगर, साठे चौक आदी भागात मोकाट जनावरे रस्त्यावर फिरत असल्याने व याबाबीकडे महापालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे याचा वाहनचालकास त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत महापालिकेने काय उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२९-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) काही भागात कोंडवाडा विभाग व क्षेत्रिया कार्यालयातील कायमस्वरुपी व कंत्राटी मजूर व कंत्राटी वाहनामार्फत वेळोवेळी महानगरपालिकातर्फे मोहिम घेण्यात आली आहे. माहे जुलै, २०१६ श्री.गणेश उत्सव, नवरात्र व दसरा निमित्त कंत्राटी कर्मचारी लावून शहरातील मोकाट जनावरे ०१ एप्रिल, २०१६ ते ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत २३६ जनावरे पकडण्यात आली. त्यापैकी १८२ जनावरे मालकांनी सोडवून घेऊन रु.८४,३५०/- इतका दंड वसुल करण्यात आला. तसेच ५४ जनावरे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्र.१५८ दिनांक २७/११/२००६ कृष्णा गोरक्षण संस्था, पानभोसी व गुरुवर्य स्वामी गोशाळा, घुंगराळा या संस्थेस पालन करण्यास देण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात बुरुड व्यवसायाला संरक्षण देण्याबाबत**

**(४) १४१५२ (२२-१२-२०१५). श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यात बांबूच्या वाढलेल्या दरांमुळे येथील बुरुड व्यवसायाला उतरती कळा लागली आहे, त्यामुळे या व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या खादी ग्रामोद्योग विभागाने या व्यवसायाला संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१९-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

बांबुची लागवड कमी प्रमाणत होत असल्याने व बांबुच्या वाढलेल्या दरांमुळे कारागीरांना बांबुच्या वस्तु तयार करण्यासाठी कच्चा माल उपलब्ध होण्यास अडचणी येत आहेत.
(२) महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळामार्फत बुरुड व्यवसायासाठी जास्तीत जास्त लाभार्थ्यांना मंजूर कर्जाच्या ५०% प्रमाणे अनुदान देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईत परदेशी बनावटीच्या वाहनांची तस्करी करणाऱ्या रॅकेटबाबत**

**(५) १७९०६ (०३-०५-२०१६). श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सुसाट वेगाने धावणारी परदेशी बनावटीची तसेच सीमा शुल्क चुकवून महागड्या आठ वाहनांची विक्री करणारे रॅकेट मुंबई पोलिसांना दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर वाहनांची किंमत सुमारे २३ लाख रुपये असून या वाहनांचे सुट्टे भाग हे आयात करणाऱ्या कंटेनरमधून मुंबईत आणले जात असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुट्टे भाग आणल्यावर त्याची जोडणी करुन ही वाहने दक्षिण मुंबईतील डोंगरी व मुसाफिरखाना परिसरातील एका ठिकाणी विक्रीसाठी ठेवण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर परदेशी बनावटीची वाहने विक्रीसाठी मुंबईत आणणाऱ्या तस्करांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) परदेशी बनावटीची वाहने विक्रीसाठी मुंबईत आणणाऱ्या तस्करांवर मुंबईतील गुन्हे शाखे अंतर्गत मोटार वाहन चोरी विरोधी पथक, मुंबई यांनी खाली नमूद प्रमाणे कारवाई केलेली आहे.

१. गु.प्र.शा.गु.र.क्र.०५/२०१६, कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२० भा.द.वि. अन्वये दिनांक ०८ जानेवारी, २०१६ रोजी गुन्हा दाखल केला असून सदर गुन्ह्यात इसम नामे अमजद मोहम्मद फारुक बकाली, ३८ वर्षे यास अटक करुन त्याचे ताब्यातून ०२ परदेशी बनावटीच्या मोटार सायकली किंमत अंदाजे ४ लाख रुपये हस्तगत केल्या तसेच

२. इसम नामे मन्सूर शमीम खान यांचे ताब्यातून मुसाफिरखाना परिसरातून ०६ परदेशी बनावटीच्या मोटार सायकली किंमत अंदाजे १९ लाख रुपये हस्तगत केल्या आहेत. फौ.दं.प्र.सं.कलम १०२ अंतर्गत कारवाई करुन मा.महानगर दंडाधिकारी सो.,सुट्टीचे न्यायालय, किल्ला कोर्ट, मुंबई यांचे कडून फौ.दं.प्र.सं.कलम १५५ अन्वये तपास करण्याचे परवानगी आदेश प्राप्त केले आहेत. सदर बाबतची माहिती मा.सहाय्यक आयुक्त कस्टम., प्रतिबंधक, बॅलार्ड इस्टेट, मुंबई यांना देण्यात आला असून सदरहू गुन्हा तपासधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नौपाडा (ठाणे) याभागातील चोरीच्या घटना रोखण्याबाबत**

**(६) १८०७७ (२९-०४-२०१६). ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नौपाडा (ठाणे) येथील चरई या शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या जनप्रिय सहकारी पतपेढी चोरट्यांनी फोडून तिजोरीसह ३ लाख ६६ हजार १२२ रुपयांची रोकड चोरुन नेल्याची घटना माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिरानंदनी भागात दोन ज्वेलर्स दुकानात धाडसी चोरी करुन लाखोचा ऐवज चोरुन नेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चोऱ्या रोखण्याबाबत व उक्त चोऱ्यांचा तपास लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालातील नौपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत जनप्रिय सहकारी पतपेढीत रु.३,६६,१२२/- एवढ्या रकमेची चोरी झालेली असून याबाबत नौपाडा पोलीस स्टेशन गु.र.क्र.४/२०१६, भादवि कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच कासारवडवली पोलीस ठाणे परिसरातील ज्वेलर्स दुकानात एकूण घरफोडी चोरी प्रकरणी रु.२,२५,९०,०००/- किंमतीचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेल्याबाबत गु.र.क्र.३०८/२०१५ कलम ४५४, ४५७, ३८०, २०१, ४११, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून याबाबत आरोपीना अटक केली असून पोलीस तपास चालू आहे.

(३) वरील घटनेबाबत ठाणे पोलीस आयुक्तालयात असणाऱ्या पोलीस ठाण्यामध्ये सर्वत्र दिवसा व रात्री बिट मार्शल कार्यरत असून गुन्हे प्रकटिकरण कक्षातील साध्या वेशातील पोलीस अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करीत असतात. त्यांना पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बिट मार्शल व नाकाबंदीचे कर्मचारी एकत्रितपणे बँका, ज्वेलर्स, दुकाने यांना भेटी देऊन हद्दीत कार्यरत असतात. तसेच सदरहू गुन्ह्यातील आरोपींना शोधण्याचे कसोशिने प्रयत्न करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात पोलिसांनी अवैद्य फटाक्याचा ट्रकवर कारवाई न करता सोडून दिल्याबाबत**

**(७) १८५४२ (२९-०४-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात दिनांक ६ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास तक्रारदाराने पकडून दिलेला अवैद्य फटाक्याचा ट्रकवर कारवाई न करता सोडून दिल्यानंतर तक्रारदारालाच जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गैरकाम करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना, पोलीस आयुक्तांनी पाठीशी घातल्याचे प्रकरण माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले व तदनुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी पोलीसांनी तपासात फटाक्याच्या ट्रकचा पंचनामा केला. परंतु त्यात आक्षेपार्ह संशयीत वस्तु मिळून आलेल्या नाहीत. तसेच जास्त डेसिबलचे फटाके आढळून आले नाहीत. तसेच ट्रकचे वजन केले असता ते वाहतुकीच्या नियमानुसार बरोबर वजन असल्याचे आढळून आल्याने सदर ट्रक फटाक्यासह सावित्री फटाके एजन्सीच्या मालकाच्या ताब्यात देण्यात आल्या आहे.

(३) विलंब झालेला नाही.

---

**हरियाणातील एका कुख्यात गुंडाचा मुंबई येथे पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाल्याच्या घटनेबाबत**

**(८) १८८९२ (२८-०४-२०१६). ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हरियाणातील कुख्यात गुंड संदिप गाडौली याचा अंधेरी (मुंबई) येथील हॉटेल एअरपोर्ट मेट्रो येथे पोलिसांच्या गोळीबारात दिनांक ७ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मृत्यू झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास करण्याचे आदेश पोलीस आयुक्त, मुंबई यांनी मुंबई क्राईम ब्रँचला दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, तपासात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सदर घटनेबाबत एम.आय.डी.सी.पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९२/१६ कलम ३०२, ३५३, ३३२ भादंविसह ३, २५, २७ भाहका प्रमाणे दिनांक ०७ फेब्रुवारी, २०१६ रोजी गुन्हा नोंद असून गुन्ह्याचा पुढील तपास गु.प्र.शा.गु.र.क्र. १२/१६ कलम ३०२, ३५३, ३३२, भादंवि सह ३, २५, २७ भाहका प्रमाणे विशेष तपास पथकाकडून चालू आहे.

सदरहू प्रकरण तपासाधिन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील सिम्बायोसिस विधी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी करावयाची कार्यवाही**

**(९) १९३१५ (१९-०८-२०१६). डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील सिम्बायोसिस विधी महाविद्यालयातील प्राध्यापक यांनी सरकारी वकिलांना किमान ६० दिवसांचे सक्तीचे प्रशिक्षण द्यावे, दोषी व्यक्तींना शिक्षा देण्याचे प्रयत्न वाढवावे, सरकारी व अतिरिक्त सरकारी वकिलांची परिक्षा घेऊन निवड करावी इत्यादी अनेक सूचना असणारे निवेदन माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री तसेच विधी व न्याय विभाग यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनातील सूचनासंदर्भात शासनाचे अभिप्राय काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) सिम्बायोसिस लॉ स्कूल, पुणे या संस्थेने मा.मुख्यमंत्री कार्यालयास या संदर्भात सादर केलेले निवेदन शालेय शिक्षण व क्रिडा विभागास माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये पाठविण्यात आले असून दिनांक २०/०९/२०१६ रोजी ते विधी व न्याय विभागाकडे हस्तांतर करण्यात आले आहे.

(२) सरकारी वकिलांना प्रशिक्षण देण्यासाठी शासनाने उत्तन जि.ठाणे येथे महाराष्ट्र ज्युडिशीयल ॲकॅडमी ॲन्ड इंडियन मेडिटेशन सेंटर ॲन्ड ट्रेनिंग इस्स्टिट्युट स्थापन केलेली असून तेथे विविध विषयावर विधि विषयक प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात. तथापि उपरोक्त निवेदनातील सूचना विचारात घेऊन तेथील अभ्यासक्रमात त्याचा अंतर्भाव करण्याबाबत सहसंचालक, महाराष्ट्र ज्युडिशीयल ॲकॅडमी ॲन्ड इंडियन मेडिटेशन सेंटर ॲन्ड ट्रेनिंग इस्स्टिट्युट उत्तन, जि.ठाणे यांना कळविण्यात येत आहे.

---

**महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत अन्न धान्यांची वाहतूक करणाऱ्या कंत्राटदारांनी केलेला गैरव्यवहार**

**(१०) १९३१९ (१६-०८-२०१६). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य वखार महामंडळामार्फत अन्न धान्यांची वाहतूक करणाऱ्या कंत्राटदाराने करोडो रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ५०० कोटींची कंत्राटे घेवून गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदारांची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, सदर चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) लागू नाही.
(३) लागू नाही.
(४) लागू नाही.

---

## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत विधिमंडळाला सादर न केल्याबाबत

**(११) १९५१९ (२७-०७-२०१६). श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाने चार हजार कोटी रुपयांचा लेखापरीक्षण अहवाल विहित मुदतीत विधिमंडळाला सादर केलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंडळाकडे विकासकांकडून उपकरापोटी जमा केलेले कोट्यवधी रुपयांचे धनादेश बाउन्स होवूनही मंडळाकडून विकासकांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०२-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.
(३) (i) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम १८(१) नुसार बांधकाम कामगारांच्या कल्याणार्थ त्रिपक्षीय मंडळ स्थापन करणे अपेक्षित आहे. परंतु २००७ पासून २०११ पर्यंत केवळ शासकीय सदस्यांचे मंडळ कार्यरत होते.

दिनांक १ मे, २०११ रोजी त्रिपक्षीय संतुलित मंडळाची स्थापना करण्यात आली. त्यानंतरच प्रत्यक्षात मंडळाच्या कामकाजाला सुरूवात झाली. सन २००७ ते सन २०११ या कालावधीत कल्याणकारी योजना कार्यान्वित नसल्यामुळे प्रत्यक्ष खर्च झालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

तसेच मंडळाकरीता मंजूर करण्यात आलेल्या ५६ पदांची अद्याप भरती करण्यात आलेली नसल्याने प्रशासकीय कामकाज अतिरिक्त स्वरुपात कामगार आयुक्त कार्यालयाकडून चालविले जात आहे. त्यामुळे मंडळाचे वार्षिक अहवाल व लेखे विहीत मुदतीत विधीमंडळास सादर करणे शक्य झालेले नाही.

सद्य:स्थितीत मंडळाकडून सन २००७-२००८ पासूनचे लेखे बाह्स्त्रोत यंत्रणेमार्फत तयार करुन घेण्याचे काम चालू असून लेखापरिक्षण अहवाल प्राप्त झाल्यावर वार्षिक अहवाल व लेखापरिक्षण अहवाल विधीमंडळास सादर करण्याची कार्यवाही शासन स्तरावरुन करण्यात येईल.

(ii) विविध प्राधिकरणे/विकासकांकडून एकूण ११६१ प्रकरणामध्ये रु.१७.५९ कोटी रक्कम धनादेशाद्वारे उपकरापोटी मंडळाच्या बँक खात्यामध्ये पाठविण्यात आली होती. परंतु सदरचे धनादेश वटले गेले नव्हते, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, मंडळाने पाठपुरावा करुन १५.१७ कोटी इतक्या रकमेची वसुली केलेली आहे. तसेच उर्वरित रक्कम वसुलीची कार्यवाही सुरू असून सदर प्रकरणास जे जबाबदार आहेत त्यांच्या विरुध्द फौजदारी कारवाई करण्याबाबत कामगार आयुक्त यांनी निदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धारावी (मुंबई) येथील झोपडपट्टी पुनर्विकासाबाबत**

**(१२) १९५२४ (१९-०८-२०१८). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.अनिल परब, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.अनिल भोसले, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.रामहरी रुपनवर : तारांकित प्रश्न क्रमांक १४७३० ला दिनांक १३ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी (मुंबई) येथील विस्तीर्ण अशा १८३ हेक्टर जागेत चार सेक्टरमध्ये उभ्या असलेल्या ५९ हजार झोपडयांचा पुनर्विकास करुन तेथील रहिवाश्यांना चांगली घरे देण्याचा निर्णय शासनाने माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पातील कामे कोणकोणत्या विकासकांना देण्यात आली आहेत, याबाबत विकासकांना कोणत्या अटी व शर्ती घालून देण्यात आल्या आहेत व हा प्रकल्प किती वर्षामध्ये पूर्ण करण्यात येणार आहे,

(३) तसेच, म्हाडाच्या धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत सेक्टर-५ च्या पात्र झोपडीधारकांना दिनांक ३ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास फ्लॅटचा ताबा हस्तांतरित करुनही त्यांनी झोपडीचा ताबा म्हाडाला दिला नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झोपडीधारकांनी झोपडीचा ताबा न देण्याची कारणे काय आहेत व ताबा न देणा-या झोपडीधारकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०७-१०-२०१६) :** (१) व (२) धारावी पुनर्वसन प्रकल्पाद्वारे धारावी अधिसूचित क्षेत्रातील सेक्टर १ ते ४ च्या पुनर्विकासाकरिता जागतिक स्तरावर जाहिरात देवून दिनांक ३०.१.२०१६ पासून सुरू केलेल्या निविदा प्रक्रियेला पाच वेळा मुदत वाढ देऊनही प्रतिसाद मिळू शकलेला नाही. सबब, निविदा प्रक्रिया व्यपगत झालेली आहे. प्राप्त परिस्थितीत धारावी अधिसूचित क्षेत्राचा पुनर्विकास होण्याच्या अनुषंगाने इतर पर्यायांचा विचार सुरु आहे.

(३) धारावी अधिसूचित क्षेत्रातील सेक्टर १ ते ५ पैकी सेक्टर ५ पुनर्विकास म्हाडामार्फत करण्यात येत आहे. सेक्टर ५ मधील म्हाडाच्या मालकीच्या जागेवर ३५८ निवासी सदनिकांचे स्टील्ट+१८ मजल्यांची इमारत क्रमांक १ बांधून पूर्ण करण्यात आली आहे आणि तेथे पुनर्वसन करण्यासाठी जवळ असलेले म्हाडाच्या जमिनीवरील "जे" क्लस्टरमधील २६५ पात्र निवासी झोपडीधारकांना ताबापत्र देऊन दिनांक ३.५.२०१६ रोजी इमारत क्रमांक १ मधील सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे व त्यांच्या झोपड्या रिकाम्या करुन झोपड्यांचा ताबा म्हाडाने घेतला असल्याचे म्हाडा, मुंबई मंडळ यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासनाने राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधिशांना**
**लॅपटॉपसाठी मंजूर केलेला निधी परत घेतल्याबाबत**

**(१३) १९५६६ (१९-०८-२०१६). ॲड.अनिल परब, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने राज्यातील कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधिशांना लॅपटॉपसाठी ३१ मार्च, २०१६ रोजी मंजूर केलेला रुपये ३५ लाख इतका निधी त्याच दिवशी परत काढून घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लॅपटॉपच्या खरेदीसाठी उक्त निधी मंजूर केला असतानाही सदरहू निधी काढून घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले तद्नुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२३-०९-२०१६) :** (१) नाही.
(२), (३) व (४) वित्त विभागाच्या दिनांक ३१.३.२०१६ च्या पत्रानुसार बीम्स प्रणालीमार्फत अनुदान प्राधिकृत करुन देयके प्राधिकारपत्र काढण्याची मुदत दिनांक ३१/३/२०१६ ला रात्रौ १०.०० वाजेपर्यंत होती. मा.उच्च न्यायालयाने सादर केलेल्या ४१७ लॅपटॉपच्या रु.२,३५,२३,०५३/- इतक्या रकमेच्या खरेदी प्रस्तावास वित्त विभागाने दिनांक ३१/३/२०१६ ला मान्यता दिली. त्यानुसार दिनांक ३१/३/२०१६ ला शासन निर्णयही काढण्यात आला पण ही कार्यवाही होईपर्यंत वरीलप्रमाणे विहित मुदतीत संगणक वितरण प्रणालीनुसार रात्रौ १०.०० पर्यंत निधीचे वितरण करता आले नाही.

वित्तीय वर्ष सन २०१६-२०१७ मध्ये सदरचा निधी दिनांक २/५/२०१६ च्या ज्ञापनान्वये मा.उच्च न्यायालयास उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

---

**कांदिवली (मुंबई) येथील शासकीय मालकीचा सुमारे १० एकर मोकळा भूखंड मे.रुचिप्रिया डेव्हलपर्सला दिल्याबाबत**

**(१४) १९६१५ (१९-०८-२०१६). श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.रामराव वडकुते, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कांदिवली (मुंबई) येथील सुमारे १० एकर मोकळया भूखंडाच्या मालमत्तापत्रकावर शासनाचे नाव असतानाही हा भूखंड झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातील अधिकाऱ्यांनी मे.रुचीप्रिया डेव्हलपर्सला दिल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणातील अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (२७-०९-२०१६) :** (१) सीटीएस क्र.१६३ (पै) व १६६, हनुमाननगर कांदवली मुंबई या मिळकतीमधील ४७७६९१.६२ चौ.मी.क्षेत्रावरील योजनेस दिनांक ११.१२.२००९ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात आशयपत्र दिले आहे. या योजनेच्या माध्यमातून ४०४७० चौ.मी.क्षेत्रावर महसूल विभागाची बांधकाम परवानगी न घेता बांधकाम सुरू केल्याबद्दल जिल्हाधिकारी यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सदर बांधकामास स्थगिती देण्याची विनंती केली होती. त्यास अनुसरुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत दिनांक १४/८/२०१५ अन्वये मे.रुचीप्रिया प्रा.लि. यांना काम बंद करण्याची नोटिस दिली असून सद्य:स्थितीत काम बंद आहे. या नोटीसीविरुद्ध विकासकाने उच्चस्तरीय समितीकडे दाखल केलेल्या अपील क्र.२९/२०१६ मध्ये समितीने दिनांक ०५/०३/२०१६ अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना सर्व मुद्दयावर पुनर्विचार करावा असे आदेशित केले आहे. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दिनांक २०/९/२०१६ रोजी सुनावणी आयोजित केली आहे. दरम्यान जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १०/२/२०१६ च्या पत्रान्वये न.भू.क्र.१६३ अ मधील ४०,४७० चौ.मी.मोकळा भूखंड ताब्यात घेण्याच्या सुचना क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या होत्या. त्यानंतरही विकासकाच्या विनंती अर्जाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक २५/४/२०१६ व दिनांक २९/६/२०१६ रोजी आदेश पारित केले असून बांधकामासह जमिनीचा ताबा घेण्याची कार्यवाही सुरू आहे असा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचा अहवाल आहे.

(२) व (३) वर नमूद मिळकतीवरील योजने संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका क्र.१०४/२०१२ व रिट याचिका क्र.१६०७,१६१०,१६१८,१६१९ व १६२०/२०१५ दाखल करण्यात आल्या असून प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

---

**मुंबई शहरातील बी.डी.डी. चाळीचा पुनर्विकासाबाबत**

**(१५) १९६७२ (२३-०८-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील वरळी, नायगाव, ना.म.जोशी मार्ग व शिवडी येथील बी.डी.डी. चाळींच्या पुनर्विकासाचा प्रकल्प योग्यरितीने राबविण्यासाठी तसेच म्हाडास मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास एक समिती नेमली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समितीच्या पुनर्विकासाबाबत दिनांक ३० जून, २०१६ रोजी पर्यंत किती बैठका झाल्या आहेत,

(३) असल्यास, या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (१३-१०-२०१६) :** (१) बी.डी.डी.चाळीच्या पुनर्विकासाबाबत दिनांक ३०/३/२०१६ रोजी सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

सदर शासन निर्णयातील निर्णय क्र.३ अन्वये राज्याचे मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) सदर समितीच्या दिनांक १३/५/२०१६ रोजी तसेच दिनांक ३०/६/२०१६ रोजी अशा २ बैठका झाल्या आहेत.

(३) उपरोक्त बैठकानंतर समितीने मान्य केलेले कार्यवृत्त उचित कार्यवाहीस्तव निर्गमित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात विविध भागातून मा.उच्च न्यायालय, मुंबईचे स्वतंत्र खंडपीठ स्थापन करण्याची होत असलेली मागणी**

**(१६) १९७७२ (२३-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४५९८ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नाशिकसह विविध भागातून मा.उच्च न्यायालय, मुंबईचे खंडपीठ स्थापन करण्याबाबत मागणी होत असल्याने या मागणीच्या अनुषंगाने मा.मुख्य न्यायमुर्तींनी मुंबई उच्च न्यायालयातील तीन न्यायमुर्तींची समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रलंबित खटल्यांची संख्या, मुंबईपासूनचे अंतर व लोकसंख्या या निकषावर मागणीचे अनुषंगाने उच्च न्यायालयाचे नवीन खंडपीठ स्थापन करणेबाबत गठीत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील शिफारशीचे स्वरुप काय आहे व सदर मागणीचे अनुषंगाने कोणकोणत्या ठिकाणी मा.उच्च न्यायालय, मुंबईचे नवीन खंडपीठ स्थापन करण्याची शिफारस अहवालात करण्यात आली आहे,
(४) असल्यास, कोल्हापुर व पुणे येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा अशी शिफारस मा.मुख्य न्यायमुर्ती मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, नाशिकचे उद्योग, व्यापार, कृषि, शिक्षण, तंत्रज्ञान इत्यादी बाबत वाढते महत्व, लोकसंख्या आणि मुंबईपासुनचे अंतर विचारात घेता नाशिक येथेही स्वतंत्र नवीन खंडपीठ स्थापन व्हावे म्हणुन स्थानिक विधी तज्ञांकडून मागणी करण्यांत येत असल्याचे पार्श्वभूमीवर या मागणीबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) होय.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) कोल्हापूर व पुणे येथे मा.उच्च न्यायालय, मुंबईचे फिरते खंडपीठ (सर्किट बेंच) स्थापन करण्याबाबत सकारात्मक विचार व्हावा, अशी शिफारस मा.मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांनी शासनास केलेली नसून शासनाने मा.मुख्य न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई यांना केली आहे.
(५) केंद्र शासनाने नियुक्त केलेल्या जसवंतसिंग समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये नवीन खंडपीठ स्थापनेबाबत निकष विहीत केले आहेत. त्यापैकी एक निकष आहे की, नवीन खंडपीठ स्थापन करण्यासाठी क्षेत्र निश्चित करताना राज्याच्या लोकसंख्येच्या २५% त्याचे लाभार्थी असावेत. तसेच मुख्य पीठापासून प्रस्तावित खंडपीठाचे अंतर, मुख्यपीठात एकूण प्रलंबित खटल्यांच्या संख्येशी प्रस्तावित ठिकाणी खटल्यांचे प्रमाण व तेथील लोकसंख्या या निकषांच्या आधारे नवीन खंडपीठ स्थापनेबाबत विचार करण्यात येतो.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खर्डी (जि.ठाणे) येथील आश्रमशाळेतील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(१७) १९८३२ (१६-०८-२०१६). प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (जि.ठाणे) येथील शहापूर आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत २३ शासकीय अनुदानित आश्रमशाळांमधील शिक्षणभरती प्रक्रियेस विलंब होत असल्याने आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार असल्याचे माहे मे, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आश्रमशाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

शासकीय आश्रमशाळेतील रिक्त असलेल्या शिक्षक पदावर तासिका पध्दतीने शिक्षकांची नियुक्ती केली जात असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.

(२) अंशतः खरे आहे.

शहापूर प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेत मुख्याध्यापकासह शिक्षकांची एकूण ३०५ पदे मंजूर असून २२७ पदे भरलेली आहेत व ७८ पदे रिक्त आहेत. अनुदानित आश्रमशाळेतील १९० पदे मंजूर असून १७९ पदे भरलेली व ११ पदे रिक्त आहेत.

शासकीय आश्रमशाळेतील रिक्त पदे पदोन्नती समितीची बैठक घेऊन पदे भरण्याची कार्यवाही अपर आयुक्त, ठाणे यांचे मार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासींच्या जमिनी नियमबाह्यरित्या विक्रीचा निर्णय रद्द करण्याबाबत**

**(१८) २००५५ (१६-०८-२०१६). डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासींच्या जमिनीचे बिगर आदिवासींकडे होणारे हस्तांतरण रोखण्यासाठी इतर राज्यात असलेल्या अशा कायद्यांची तपासणी करून महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ मध्ये योग्य तो बदल करण्यासाठी शिफारशी सुचविण्याकरिता स्थापित समितीने दि.१८/५/२०१५ रोजी सादर केलेल्या अहवालाच्या छाननीची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदरहु छाननीची कार्यवाही केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०७-११-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्नाधिन समितीचे अध्यक्ष श्री.एस.एस.संधू, तत्कालिन प्रधान सचिव (महसूल) यांनी दिनांक १८ मे, २०१५ रोजी आदिवासी विकास विभागाकडे अहवाल सादर केलेला आहे. प्रस्तुत अहवालामध्ये सुचविलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने सूचना/अभिप्राय शासनास कळविण्याबाबत दिनांक २४ जून, २०१६ च्या पत्रान्वये महाराष्ट्र जनजाती सल्लागार परिषदेच्या मा.सदस्यांना विनंती करण्यात आली आहे. मा.सदस्यांकडून सूचना/अभिप्राय शासनास अप्राप्त आहेत. त्यामुळे शासन स्तरावर याप्रकरणी अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

---

**आदिवासी आश्रमशाळेतील मृत बालकांच्या पालकांना सांत्वन निधी देण्याबाबत**

**(१९) २००७९ (०६-०८-२०११). डॉ.अपूर्व हिरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहर, जिल्ह्यात व शासकीय कार्यालयांमध्ये महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची कमतरता आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसल्यामुळे महिलांमध्ये मुत्राशयाच्या आजारांची संख्या वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त प्रकरणी महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे निर्माण करण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) नाशिक शहर, जिल्ह्यात व शासकीय कार्यालयांमध्ये महिलांसाठी पुरेशा प्रमाणात स्वतंत्र स्वच्छतागृहे उपलब्ध आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पंतप्रधान कौशल्य विकास योजना राज्यात लागू करण्याबाबत**

**(२०) २००९१ (२३-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्‌योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने देशभरातील युवकांना रोजगाराची संधी मिळावी यासाठी पंतप्रधान कौशल्य विकास योजना सुरु केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजना राज्यात लागू करावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२७-१०-२०१६) :** (१) होय.
(२) सदर योजना केंद्र शासनामार्फत (National Skill Development Corporation-NSDC) राबविण्यात येत असून या संदर्भात राज्य शासनाकडून कोणतीही कार्यवाही अपेक्षित नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**राज्यातील विविध कामगार कल्याण मंडळे बरखास्त करुन एकच कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(२१) २०१३१ (२३-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सध्या कार्यान्वित असलेली विविध कामगार कल्याण मंडळे बरखास्त करुन एकच कल्याणकारी महामंडळ स्थापन करण्याच्या शासनाच्या प्रस्तावास कामगार संघटनांनी विरोध केला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगार संघटनांना विश्वासात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, सदर महामंडळाच्या कार्यपध्दतीचे स्वरुप काय असणार आहे व सदरहू महामंडळ केंव्हापासून अस्तित्वात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२१-१०-२०१६) :** (१) नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ च्या कलम १४ अन्वये महाराष्ट्र असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा नियम २०१३ पारीत केले असून असंघटीत कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ च्या कलम ६ अन्वये महाराष्ट्र राज्य सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्याबाबतच्या प्रस्तावावर कार्यवाही प्रगती पथावर असून या मंडळाचे गठण झाल्यावर सर्व क्षेत्रातील असंघटीत कामगारांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ देणे शक्य होईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नंदूरबार येथील आदिवासी विकास विभागामार्फत चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांची करण्यात येणारी भरती रोखण्याबाबत**

**(२२) २०१९० (१९-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नंदूरबार येथील आदिवासी विकास विभागाने चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द केली असून ही भरती प्रक्रिया रोजंदारी कर्मचा-यांवर अन्याय करणारी असल्याने सदर भरती रद्द करावी म्हणून रोजंदारी वर्ग तीन व चार कर्मचारी संघटनेने आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर जाहिरात नियमानुसार प्रसिध्द करण्यात आल्याने रद्द करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील उड्डाणपूलाच्या देखभालीचा खर्च एमएसआरडीसीला करावा लागत असल्याबाबत**

**(२३) २०२०७ (१९-०८-२०१६). श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिया, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १५३६६ ला दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उततराच्या संदर्भात :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील टोल वसूलीचे कंत्राट सन २०१०-२०११ पासून एमईपी या कंपनीला देण्यात आल्यामुळे रुपये २२४२.३५ कोटी इतकी रक्कम एमईपी इन्फास्ट्रक्चर प्रायव्हेट लि. या कंपनीकडून एमएसआरडीसीला देण्यात आली असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील ३१ उड्डाणपूल सन २००० च्या आधीचे असून त्यांच्या बांधकामांचा खर्च शासनाच्या तिजोरीतून झालेला असतानाही एमईपीला टोल वसूलीचे कंत्राट देण्यात आले आहे, तसेच उपरोक्त कालावधीत उड्डाणपूलाच्या देखभालीची रक्कम एमइपीने टोल मधून वसूल करणे अपेक्षित असताना उड्डाणपूलावरील देखभालीचा खर्च एमएसआरडीसीला करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१०-२०११ एमईपी कंपनीला पाचही टोल नाक्यांवरील टोल वसुली कंत्राट देताना त्या कंपनी बरोबर एमएसआरडीसीने केलेल्या करारात नमुद करण्यात आलेल्या प्रमुख अटी कोणत्या, या अटीचे पालन कंपनी करत आहे काय, तसेच उड्डाणपूलांच्या निर्मितीपासून देखभालीवर आतापर्यंत एमएसआरडीसीने केलेला खर्च किती आणि एमएसआरडीसी व एमईपी कंपनीकडून टोल मार्फत वसुली करण्यात आलेली रक्कम किती आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय निदर्शनास आले व त्याअनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०९-११-२०१६) :** (१) नाही.

मे एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या कंपनीला २७ उड्डाणपूल व अनुषंगिक कामे यांच्या देखभाल दुरुस्तीसह पथकर वसूलीचे कंत्राट रुपये २१०० कोटी एक रकमी आगाऊ रक्कम घेऊन दिनांक २०/११/२०१० पासून १६ वर्षासाठी देण्यात आले आहे.

(२) नाही.

दिनांक २०/११/२०१० पासून २७ उड्डाणपूल, ४ पादचारी मार्ग, १ रेल्वे ओव्हर ब्रिज व १ अंडर ब्रिज इ. बांधकामांचा देखभाल दुरुस्तीचा खर्च एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. करीत असून या व्यतिरिक्त महामंडळाच्या ताब्यात ५ उड्डाणपूल व एक रेल्वे ओव्हर ब्रिज असून त्याचा देखभाल दुरुस्तीचा खर्च महामंडळ करीत आहे.

(३) एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. सोबत केलेल्या करारानुसार कंत्राटदाराने मुंबई प्रवेशद्वाराच्या ५ पथकर नाक्यांवर शासन अधिसूचनेप्रमाणे पथकर वूसली करावयाची आहे तसेच मुंबई महानगर परिसरातील २७ उड्डाणपूल, ४ पादचारी मार्ग, १ रेल्वे ओव्हर ब्रिज व १ अंडर ब्रिज यांची देखभाल व दुरुस्ती करावयाची आहे. त्याप्रमाणे कंत्राटदाराकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

महामंडळाने या प्रकल्पावर देखभाल दुरुस्तीकरिता १९९९ ते २०१० पर्यंत ८७.२८ कोटी रुपये व सन २०१० पासून महामंडळाच्या ताब्यात असलेल्या उड्डाणपूल व रेल्वे पूलावर दुरुस्तीकरिता ३०.४७ कोटी एवढा खर्च केला आहे. पथकरातून महामंडळास आतापर्यंत ३१६९.२८ कोटी एवढी रक्कम प्राप्त झाली असून एमईपी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी सन २०१० पासून आतापर्यंत १७११.४६ कोओी एवढी पथकर वसुली केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांकडून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्राचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(२४) २०२४८ (२३-०८-२०१६). डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याचे मा.राज्यपाल यांनी लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी शासकीय विभागातील गट-अ, ब, क व ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र विहित करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने निर्गमित केले परंतु या आदेशाचे शासकीय कर्मचाऱ्यांकडून पालन होत असल्याचे दिनांक ५ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यपाल यांचे आदेशाची प्रशासनाकडून पायमल्ली होत असून शासनाच्या विविध विभागात सध्या कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना दोन पेक्षा जास्त अपत्य असून याबाबत शासनाकडे कोणतीही माहिती उपलब्ध नसल्याने याकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन पेक्षा अधिक अपत्य असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांवर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-११-२०१६) :** (१) शासकीय विभागातील गट-अ,ब,क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विहीत करणारे नियम, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ दिनांक २८/०३/२००५ च्या अधिसूचनेन्वये लागू करण्यात आलेले आहेत. सदरहू अधिसूचनेनुसार शासकीय सेवेतील गट अ, ब, क आणि ड मधील कोणत्याही पदासाठी अर्ज करण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती, अर्जासोबत या नियमांतील नमुना “अ” मधील प्रतिज्ञापन सादर करण्याचे आदेश दिलेले आहेत.

(२) शासनाच्या विविध विभागात सध्या कार्यरत असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे संकलित केली जात नसली तरी याबाबतची माहिती संबंधीत प्रशासकीय विभागाकडून मागविण्यात आली आहे.

(३) व (४) दोन पेक्षा जास्त अपत्ये असलेल्या व म.ना.से. (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील नियमांचे पालन न करणाऱ्या उमेदवारांना शासकीय सेवेत नियुक्ती दिली जात नाही. मात्र शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर दोन पेक्षा अधिक अपत्ये जन्माला आल्याचे आढळून आल्यास अशा शासकीय कर्मचाऱ्यांविरुध्द कशा प्रकारे कारवाई करता येईल ही बाब स्वतंत्रपणे तपासण्यात येत आहे.

---

**स्थानिक संस्था कर (एल.बी.टी.) रद्द केल्याने महानगरपालिकांच्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(२५) २०३०५ (२३-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्थानिक संस्था कर (एल.बी.टी) दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रद्द करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आर्थिक भार वाढत असल्याचे कारण दाखवून दारु, तंबाखुजन्य पदार्थ, वाहन विक्री इत्यादी वस्तूंची उलाढाल करणाऱ्या व्यापाऱ्यांना या कराच्या कक्षेत आणून सुमारे दोन हजार कोटी रुपयांचे उत्पन्न वाढविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेण्यात आला आला आहे काय, या निर्णयाचे स्वरुप काय आहे व त्यावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, स्थानिक संस्था कर रद्द केल्यामुळे महानगरपालिकांना गतवर्षी किती अनुदान देणे आवश्यक होते व प्रत्यक्षात किती अनुदान अदा करण्यात आलेले आहे,

(४) असल्यास, स्थानिक संस्था कर रद्द केल्यानंतर महानगरपालिकांची आर्थिक स्थिती खालावत चालल्यामुळे त्यांना द्यावयाच्या अनुदानात वाढ करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-१०-२०१६) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

शासन अधिसूचना दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ अन्वये जे व्यापारी देशी दारु, विदेशी मद्य व वाईन इत्यादी वस्तुंचा व्यवसाय करतात, त्यांची खरेदी किंवा विक्रीची उलाढाल दिनांक १५ ऑगस्ट, २०१६ रोजी किंवा त्यानंतर सुरु होणाऱ्या कोणत्याही आर्थिक वर्षामध्ये रुपये ५० कोटीपेक्षा कमी असली तरी अशा व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था कर नियमाखाली नोंदणी करणे आवश्यक करण्यात आले आहे.

(३) स्थानिक संस्था कर रद्द केल्यामुळे महानगरपालिकांना सन २०१५-१६ मध्ये अनुदान देण्यासाठी निश्चित केलेल्या सुत्रानुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात रुपये ३२६७.५३ कोटी एवढे अनुदान देय होते. प्रत्यक्षात रुपये ३२९०.५० कोटी अनुदान संबंधित महानगरपालिकांना वितरीत करण्यात आले आहे.

(४) शासनाने दिनांक १ ऑगस्ट, २०१५ पासून रुपये ५० कोटीपेक्षा कमी उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांना स्थानिक संस्था करातून सुट देण्याचा निर्णय घेतल्याने महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी घट भरुन काढण्यासाठी शासनाकडून सहायक अनुदान देण्यात येत असून

हे अनुदान देताना महानगरपालिकांचे कोणतेही आर्थिक नुकसान होणार नाही याची शासनाने पुरेपुर दक्षता घेतली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने अनुदान देणे बंद केल्याबाबत**

**(२६) २०३९८ (२३-०८-२०१६). श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने अनुदान देणे बंद केल्याने राज्यातील ग्रामीण पाणीपुरवठा योजना बंद होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे मे २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कार्यक्रमांतील बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजनांचे पुनरूज्जीवन करताना संबधित ग्रामपंचायत व नगरपंचायतीनी दरमहा ७० टक्के पाणीपट्टी वसुल करून देण्यात येईल असा ठराव करून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला द्यावा लागणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता सदर वसुलीची जाचक अट रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) होय.
(३) बंद असलेल्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजंनाचे पुनरुज्जीवन केल्यानंतर त्यांची व्यवस्थित देखभाल दुरूस्ती होउन त्यामधून कायम स्वरूपी पाणी पुरवठा चालू राहण्याच्या दृष्टिने सदर तरतूद मंत्रीमंडळाच्या मान्यतेने करण्यात आली आहे. त्यामुळे सद्य:स्थितीत ती रद्द करणे योग्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात महाराष्ट्र राज्याच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित ध्वजारोहण कार्यक्रमास नायब तहसिलदार व इतर कर्मचारी गैरहजर राहिल्याबाबत**

**(२७) २०५३० (२३-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **राजशिष्टाचार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यात महाराष्ट्र राज्याच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने १ मे रोजी तहसील कार्यालय येथे आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमास ३ नायब तहसिलदारांसह ८ कर्मचारी गैरहजर असल्याने सदरहू कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी असा प्रस्ताव तहसिलदार यांनी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांचेकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिस्त भंग करणाऱ्या उक्त नायब तहसिलदार व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे (०१-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) तहसिलदार, पैठण यांचेकडून विनापरवानगी गैरहजर राहिलेल्या ५ अधिकारी/कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे वेतन कपात करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे येथील लोहियानगरात एसआरए योजनेतील इमारतीबाबत**

**(२८) २०६०७ (२३-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील लोहियानगरात प्लॉट क्र.१६० वर एसआरए योजनेंतर्गत नागरिकांसाठी उभारलेल्या इमारतीत सदनिकेवर ताबा दिला मात्र कागदपत्रे न दिल्यामुळे स्थानिकांनी याला विरोध केल्यामुळे एक नगरसेवक त्यांची मुले, कार्यकर्ते यांनी दगडफेक केली त्यात अनेक लहान मुले व महिला जखमी झाल्या असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२८-१०-२०१६) :** (१) व (२) लोहियानगर प्लॉट क्र.१६० येथे अद्यापपर्यंत इमारत उभारली नसल्याने ताबा देण्यात आले नाही, परंतु सदर प्लॉट क्र.१६० येथे इमारत बांधण्यात काही रहिवाश्यांचा विरोध आहे. झोपडपट्टी पुनर्वसनास पात्र झोपडपट्टीधारकांपैकी ७३.७५ % झोपडीधारकांनी संमती दर्शवली असून १७३ झोपडीधारकांनी या पुनर्वसनास विरोध करुन महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र लवाद बांद्रा, मुंबई येथे त्याविरोधात अपिल दाखल केले आहे. सदर झोपडपट्टी खाली करण्याचे काम सुरु असून तेथील विद्युत पुरवठा खंडीत करण्याच्या कारणावरुन सदर झोपडपट्टीतील इमारत उभारणीस समर्थन करणारे व विरोध करणाऱ्या दोन गटात वाद होऊन मारामारी झाल्या प्रकरणी खडक पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र.१२०/२०१६ भा.द.वि.कलम १४३,१४६,१४७,१४९,३३६,३३७,४५२,३२३,५०४,५०६(१),४०७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ५ आरोपी निष्पन्न झाले असून ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. ५ वा आरोपी बाल अपचारी असल्याने त्यास बाल न्यायमंडळासमोर हजर करण्यात आले आहे. सध्या सर्व अटक आरोपी जामीनावर मुक्त असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद शहरातील गाळ काढणे अशक्य करणाऱ्या इमारतींवर कारवाई करण्याबाबत**

**(२९) २०६१४ (२३-१०-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील फकीरवाडीकडून येणाऱ्या नालीतून गाळ काढणे अशक्य करुन टाकणाऱ्या औषधी भवन या इमारतीसह त्या नाल्यावरील ४ इमारतींबाबत सुनावणी घेतल्यावर अनेक त्रुटी समोर आल्याने या इमारतींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशन (औषधी भवन) यांना ९९ वर्षाच्या दिर्घ मुदतीवर भाडेपट्टयाने देण्यात आलेल्या जागेच्या करारनाम्यातील अट क्र.१३ चे पालन न झाल्याने औरंगाबाद महानगरपालिकेकडून त्यांना देण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील दहा जिल्हयांमध्ये खनिज सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याबाबत**

**(३०) २०७०० (२३-०८-२०१६). श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयांसह राज्यातील दहा जिल्हयांमध्ये खनिज सर्वेक्षण करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हा निर्णय कधीपासून अंमलात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (०१-१०-२०१६) :** (१) हे खरे आहे.

(२) खनिज सर्वेक्षणासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या वन व इतर विभागांकडून प्राप्त करण्याची कार्यवाही संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर, यांच्याकडून सुरू आहे. सदर परवानग्या प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयातील नव्या साखर करखान्यांवर बंदी घालण्याबाबत**

**(३१) २०८२७ (१९-०८-२०१६). श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयामध्ये मागील चार वर्षापासून पडणाऱ्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नव्या साखर करखान्यांवर बंदी घालण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त निर्णयानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (२९-१०-२०१६) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथील वॉर्ड अध्यक्षाची हत्या झाल्याची घटना**

**(३२) २०९९२ (२३-०८-२०१६). श्री.हेमंत टकले, श्री.रामराव वडकुते, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) च्या प्रबुध्दनगर येथील वॉर्ड अध्यक्षाची हत्या झाल्याची घटना दिनांक १० मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर हत्या करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-१०-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी उल्हासनगर पोलीस ठाणे येथे गु.र.नं.९७/१६, भा.द.वि.कलम ३०२, १२० ब, १४३, १४४, १४७, १४८, १४९, २०१, ५०६ (२) सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), मु.पो.का. कलम ३७(१), १३५ अन्वये दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी ११ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व अटक आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदर प्रकरणी मा.न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मालाड (मुंबई) पश्चिमेकडील मालवणी परिसरातील खाडीमुखाशी असलेल्या जागेवर नौदलाने टाकलेल्या भरावामुळे मच्छिव्यवसाय धोक्यात आल्याबाबत**

**(३३) २१२३७ (१२-०८-२०१६). श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (मुंबई) पश्चिमेकडील मालवणी परिसरातील खाडीमुखाशी असलेल्या दोन हेक्टर जागेवर नौदलाने टाकलेल्या १५ फुट उंचीच्या भरावामुळे खाडीचे अर्ध्याहुन अधिक पात्र बुजवली गेली असल्यामुळे या भागातील माशांची प्रजननस्थळे पूर्णपणे नष्ट झाली असून याचा परिणाम येथील मासेमारीवर झाल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मच्छिमारांचे प्रश्न सोडविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) सदरचे क्षेत्र हे संरक्षण विभागाच्या नौदलाच्या अखत्यारीतील प्रतिबंधित क्षेत्र आहे, अशी माहिती मिळाली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा (जि.पालघर) ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत**

**(३४) २१४७६ (२३-०८-२०१६). श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा (जि.पालघर) तालुका औद्योगिकदृष्ट्या वेगाने विकसीत होत असून या भागात १००० पेक्षा अधिक लहान-मोठे कारखाने असून याभागाचे मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बाबींवरून वाडा ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर ग्रामपंचायतीस नगरपंचायतीचा दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०२-११-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) वाडा जिल्हा पालघर ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर करण्याबाबतची प्राथमिक उद्घघोषणा दिनांक १/३/२०१४ रोजी करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबत**

**(३५) २१६६५ (१९-०८-२०१६). श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील धनगर समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२४-१०-२०१६) :** (१) व (२) धनगर किंवा धनगड एक आहेत किंवा कसे याबाबत टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांना संशोधन करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुसार संस्थेकडून सदर संशोधन तीन टप्प्यात करण्यात येणार आहे. त्यापैकी संशोधनाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत (Formative Research) चे काम पुर्ण झाले आहे. उर्वरित टप्प्यातील मुख्य संशोधनाचे भाग-१ व भाग-२ मधील संशोधनाचे काम पुर्ण करुन अंतीम अहवाल माहे डिसेंबर, २०१७ पर्यंत शासनास सादर करण्यात येईल, असे टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांनी शासनास कळविले आहे. तद्नुसार संस्थेचा अंतीम अहवाल शासनास प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर शहरात कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्प राबविणेबाबत**

**(३६) २१९२७ (२३-०८-२०१६). श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या तसेच पुणे हरित लवादाने दिलेल्या आदेशानुसार अहमदनगर महापालिकेने शहरातील कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्पासाठी ठेकेदार नेमला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठेकेदाराला काम दिल्यानंतर महापालिकेने त्यास आवश्यक मूलभूत सुविधा (उदा. रस्ता, वीज, पाणी) उपलब्ध करुन दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे बायोगॅस प्रकल्प ठेकेदाराला न राबवता आल्याने त्याचा ठेका रद्द करण्यात आला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नवीन ठेकेदार नेमण्याबाबत कोणती कार्यपध्दती राबविण्यात येणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

प्रकल्पासाठी नेमणूक केलेल्या ठेकदारासमवेत केलेल्या करारनाम्यामध्ये मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरालिकेची होती. सदर प्रकल्पाच्या ठिकाणी महानगरपालिकेचा घरकुल प्रकल्प असून, तेथे रस्ता, वीज पाणी या सुविधा महानगरपालिकेकडून उपलब्ध केलेल्या आहेत.

(३) सदर प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचा कालावधी कार्यारंभ दिनांकापासून ३ महिने इतका होता. परंतु सदर कालावधीत ठेकेदाराने केवळ जागेवर अर्धवट खड्डा खोदकाम व्यतिरिक्त कोणतेही काम केले नाही. त्यामुळे याबाबत ठेकेदाराला ३ वेळा कारणे दाखवा नोटीसा देण्यात आल्या. परंतु ठेकेदाराने कामात कोणतीही प्रगती न केल्यामुळे ठेकेदारासमवेत केलेला करारनामा दि.२८/१२/२०१५ रोजी रद्द करण्यात आला आहे.

(४) महानगरपालिकेने दि.१५/१/२०१६ रोजी ई-निविदा पध्दतीने निविदा मागविल्या. तथापि, प्रस्ताव प्राप्त झालेल्या दोन्ही निविदाधारकांकडे आवश्यक ती कागदपत्रे नसल्यामुळे सदरची निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. तसेच नविन ठेकेदार नेमणुकीबाबत नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविण्याचे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(३७) २२१०३ (१६-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पशुसंवर्धन विभागात अ, ब, क आणि ड संवर्गातील १ लाख पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगांव जिल्ह्यात राज्यस्तर आणि जिल्हा परिषदेचे एकूण १८९ पशुवैद्यकिय अधिकारी असून यात २५ ठिकाणी पशुवैद्यकिय अधिकाऱ्यांच्या जागा रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही.

राज्यात पशुसंवर्धन विभागात अ, ब, क व ड या संवंगात मंजूर व रिक्त पदांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट-अ | २६३४ | २२८३ | ३५१ |
| गट-ब | ४१९ | १७५ | p२४४ |
| गट-क | १८८९ | १२२५ | ६६४ |
| गट-ड | १८९९ | १०२९ | ८७० |
| **एकूण** | **६८४१** | **४७१२** | **२१२९** |

वरील तपशील विचारात घेता, पशुसंवर्धन विभागात सद्यस्थितीत गट-अ, ब, क व ड या संवर्गात एकून २,१२९ पदे रिक्त आहेत,

(२) अशंत: खरे आहे,

जळगाव जिल्हयाची राज्यस्तरीय गट-अ, ब, क व ड यांची मंजूर, भरलेल्या व रिक्त पदांचा तपशील खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| संवर्ग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन गट-अ | ८ | ६ | २ |
| पशुधन विकास अधिकारी गट-अ/ब | ११५ | ९७ | १८ |
| सहाय्यक पशुधन विकास अधिकारी -गट-क | २३ | २३ | ० |
| पशुधन पर्यवेक्षक गट-क | १३७ | १०२ | ३५ |
| परिचर (गट-ड) | २५२ | २१३ | ३९ |
| **एकूण** | **५३५** | **४४१** | **९४** |

(३) माहे जानेवारी २०१६ मध्ये अनियतकालिक बदल्यांचे वेळी जळगांव जिल्हयातील सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व पशुधन विकास अधिकारी या संवर्गातील रिक्त पदे बदलीव्दारे भरण्यात आली होती. तथापी, सदर पदावर करण्यात आलेल्या नियुक्त्या हया गैरसोईच्या व अवेळी करण्यात आल्याने संबंधीत अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर, औरंगाबाद व मुंबई याच्यांकडे अर्ज दाखल केले व न्यायालयाने सदर बदली आदेशाला स्थगिती दिली तसेच काही अधिकाऱ्यांनी शासनाकडे विनंती अर्ज करुन त्यांच्या पदस्थापनेमध्ये बदल करण्याबाबत कळविले आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी जळगांव येथे रिक्त पदावर रुजू झाले नाहीत. त्यामुळे सदरची पदे रिक्त आहेत. भविष्यामध्ये सरळसेवा पदोन्नतीच्या मार्गाने गट-अ व गट-ब संवर्गातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.

गट-क संवर्गातील पशुधन पर्यवेक्षकाची १६३ पदे सरळसेवेने भरणेबाबत शासनाचे दि.२९.१०.२०१५ च्या पत्रान्वये मान्यता देण्यात आली आहे. परंतु वित्त विभाग शासन निर्णय दि.१५ जानेवारी, २०१६ नुसार ७५ टक्के ऐवजी ५० टक्के पर्यंत पदे भरण्याचे निर्देश दिल्याने गट-क पशुधन पर्यवेक्षकांचे ५० टक्के प्रमाणे १०९ पदे व शासन निर्णय वित्त विभाग दि.०२.०६.२०१५ नुसार लिपिक वर्गीय ४ टक्के प्रमाणे १३ पदे भरण्याची जाहीरात दि.१७.०३.२०१६ रोजी वर्तमान पत्रात देण्यात आली. त्यानुसार ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली. परंतु शासनाचे दि.१९ मार्च २०१६ च्या पत्रानुसार जाहीरातीस स्थगिती देण्यात आली असल्याने सदर रिक्त पदे भरता आलेली नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मु.जे. महाविद्यालयातील विवेकानंद भवन, जळगांव येथे एमएस्सी प्रथम वर्षाचा ॲडव्हान्स कॅल्क्युलेस या विषयाची प्रश्नपत्रिका उशिरा मिळाल्याबाबत**

**(३८) २२१०५ (२३-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.जे. महाविद्यालयातील विवेकानंद भवन, जळगांव येथे दिनांक २१ एप्रिल, २०१६ रोजी एमएस्सी प्रथम वर्षाच्या ॲडव्हान्स कॅल्क्युलेस या विषयाची प्रश्नपत्रिका तब्बल ५५ मिनिटे उशिरा मिळाली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नपत्रिका उशिरा मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१६) :** (१) हे अंशता: खरे आहे. सदर विषयाचा पेपर दिनांक २०/०४/२०१६ रोजी होता. सदर परीक्षा केंद्रात तांत्रिक अडचणीमुळे ४० मिनीटे उशीरा सुरू झाली होती.

(२) महाविद्यालयातील इंटरनेट व विद्युत पुरवठयामध्ये तांत्रिकदृष्टया बिघाड झाला होता.

(३) सदर विषयासाठी या विद्यार्थ्यांना ४० मिनीटांना वेळ वाढवून दिलेला होता.

---

**जळगांव जिल्हयातील शिवाजीनगर रेल्वे उड्डाणपुलाची मुदत संपल्याबाबत**

**(३९) २२१०७ (२३-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील शिवाजीनगर रेल्वे उड्डाणपुलाची मुदत संपल्याने त्यावरून अवजड वाहनांच्या वाहतुकीला बंदी घालण्यात आली असतानाही या पुलावरून अवजड वाहनांची वाहतुक सुरू असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बंदी असताना अवजड वाहनांची वाहतुक करणाऱ्या वाहन चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) व (२) मे २०१६ मध्ये सदर पुलावरुन अवजड वाहनांची वाहतुक बंद होती.

सदर कालावधीत प्रवेश बंद मार्गाचे उल्लंघन करणाऱ्या ४० अवजड वाहनांवर शहर वाहतुक शाखा, जळगाव यांच्यामार्फत मोटार वाहन अधिनियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लाडघर (खालचा मोहल्ला), मे. लालबाग (तामसतिर्थ) (ता. दापोली, जि.रत्नागिरी) येथील खाडीवर पुलाचे बांधकाम करण्याबाबत**

**(४०) २२१९९ (१९-०८-२०१६). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लाडघर (खालचा मोहल्ला) मे. लालबाग (तामसतिर्थ) (ता. दापोली, जि.रत्नागिरी) येथील खाडीवर पुलाचे बांधकाम प्रस्तावित असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

२२) असल्यास, सदरहू पुलाच्या बांधकामास शासनाने किती निधीची तरतूद केली आहे तसेच पुलाचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-१०-२०१६) :** (१) होय.

(२) प्रश्नांकित पुलाच्या बांधकामास सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.३१.१२ लक्षची तरतूद केली आहे.

सद्यस्थितीत संकल्पचित्र मंडळाकडून पूलाचा अंतिम सर्वसाधारण मांडणी नकाशा तयार करण्याचे काम प्रगतीत आहे. सदर नकाशा प्राप्त करुन घेऊन प्रकल्पाच्या कामास तांत्रिक मान्यता प्रदान करुन व निविदा विषयक कार्यवाही पूर्ण करुन सदर काम हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बसमत (जि.हिंगोली) शहरात व सेनगांव तालुक्यात निळया रॉकेलचा काळाबाजार सुरू असल्याबाबत**

**(४१) २२२५२ (२३-०८-२०१६). श्री.सुभाष झांबड, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील बसमत शहरात व सेनगांव तालुक्यात माहे एप्रिल-मे, २०१६ या महिन्यांचे रॉकेल रास्तभावात दुकानदारांना मिळाले नसून निळया रॉकेलचा काळाबाजार सुरू असून या रॉकेलची परस्पर टँकरद्वारे तालुक्याबाहेर विक्री होत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट (०५-११-२०१६) :** (१) व (२) सेनगाव शहरातील केरोसिन वितरणाबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी केली असता किरकोळ केरासिन परवानाधारक व रास्तभाव दुकानदारांना केरोसिन मिळाले असून शिधापत्रिकाधारकांनाही केरोसिन मिळाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

सेनगाव तालुक्यातील अर्धघाऊक परवानाधारकाने केरोसिन वाटपामध्ये दिरंगाई केल्याचे आढळून आल्यामुळे सदर परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी, हिंगोली यांनी निलंबित केला आहे.

तसेच बसमत शहरातील मौजे विरेगाव व कौठा या गावास अर्धघाऊक विक्रेत्याकडून केरोसिन प्राप्त झाले नसल्याबाबतच्या तहसील स्तरावर प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने अर्धघाऊक परवानाधारकास नोटीस देण्यात आली असता आजारी असल्यामुळे केरोसिन वाटपास विलंब झाला असल्याचे अर्धघाऊक केरोसिन परवानाधारकाने आपल्या खुलाशात नमूद केले आहे. मौजे विरेगाव व कौठा या गावास केरोसिन वाटप करण्यात आले असल्याबाबत तहसीलदार, बसमत यांनी अहवालात नमूद केले आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव व बसमत तालुक्यात केरोसिनची परस्पर टँकरद्वारे तालुक्याबाहेर विक्री झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील चौक व रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४२) २२२६४ (१९-०८-२०१६). प्रा.अनिल सोले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहत इमारत क्रमांक २१२ ते २२१ या इमारतीच्या परिसरातील चौकाची व रस्त्याची दुरवस्था झाली असून या परिसरात अस्वच्छता असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू इमारतीच्या परिसरातील अस्वच्छता दूर करुन रस्त्याचे मजबुतीकरण, खंडीकरण व डांबरीकरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०८-११-२०१६) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

(२) व (३) इमारत क्र. ब-२१२ ते ब-२२१ या इमारतीच्या परिसरातील मुख्य रस्त्याचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पूर्ण करण्यात आले आहे.

इमारत क्र. ब-२१२ ते ब-२२१ या इमारतीच्या चौकाची स्वच्छता व दुरुस्ती सा.बां. विभागामार्फत करण्यात आली आहे.

अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार टप्प्याटप्प्याने हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळांमध्ये सदोष प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत**

**(४३) २२३०६ (२३-०८-२०१६). श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शालेय शिक्षण विभागातर्फे शिक्षण हक्क कायद्यातंर्गत राबविल्या जाणाऱ्या २५ टक्के आरक्षित जागांवरील प्रवेशासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविली जात असलेली प्रवेश प्रक्रिया सदोष असून शाळांनी आपल्याकडील जागा नोंदीत गैरव्यवहार केल्याचा आरोप एका राजकीय पक्षाने दिनांक ९ मे, २०१६ रोजी वा त्यादरम्यान केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी प्रवेश मिळूनही अनेक शाळांकडून प्रवेशास टाळाटाळ केली जात असल्यामुळे शिक्षण विभागाने याकडे लक्ष द्यावे अशी मागणी येथील नागरिकांकडून वारंवार होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी दोषी आढळून येणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१६) :** (१) हे खरे नाही

(२), (३) व (४) प्रश्न उदभवत नाही

---

**राज्यातील ॲडव्होकेट वेल्फेअर फंडाची मर्यादा वाढविण्याबाबत**

**(४४) २२५३५ (२३-०८-२०१६). श्री.अरुणकाका जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ॲडव्होकेट वेल्फेअर फंडाची मर्यादा वाढविण्याबाबत महाराष्ट्र बार कौन्सिलने प्रस्ताव दिला असल्याचे माहे सप्टेंबर, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०९-२०१६) :** (१) नाही. याबाबत महाराष्ट्र बार कौन्सिल कडून २००७ मध्ये प्रस्ताव झाला होता. बार कौन्सिलने २०१२ मध्ये नवीन प्रस्ताव सादर करण्याची इच्छा प्रकट केली होती.

(२) महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियमात सुधारणे संबंधी महाराष्ट्र बार कौन्सिल कडून नवीन प्रस्ताव २०१४ मध्ये प्राप्त झाला. महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियमात सुधारणा करण्यात आली असून तो दिनांक १ मे, २०१६ पासून लागू करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांचे ब्रँडिंग करण्यासाठी मुंबई हाटच्या माध्यमातून महिला बचत गट मॉल सुरू करण्याबाबत**

**(४५) २२७४५ (२४-०८-२०१६). श्री.सुनिल तटकरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला बचत गटांनी तयार केलेल्या उत्पादनांचे ब्रँडिंग करण्यासाठी मुंबई हाटच्या माध्यमातून महिला बचत गट मॉल सुरू करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २० जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(३) असल्यास, सदर योजना केव्हापासून अंमलात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२७-११-२०१६) :** (१) होय.

(२) संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या सौजन्याने "मिशन दिशा" या प्रकल्पांतर्गत "भारतातील महिलांकरीता रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण करणे" या हेतूने कौशल्य विकास व उद्योजकता विभागामार्फत मुंबई शहरातील "मेट्रो चित्रपटगृह सब-वे" (धोबीतलाव) मध्ये "महिलांनी, महिलांकरीता, महिलांकडून व्यवस्थापन केलेला महाराष्ट्र राज्यातील एकमेव सब-वे-मॉल" असे या योजनचे थोडक्यात स्वरुप असेल.

(३) याबाबत संबंधीत विभागाच्या प्राथमिक स्तरावरील बैठका घेण्यात आलेल्या असून मुंबई महानगरपालिकेकडे सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

(४) लागू नाही.

---

**अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयातील अप्पर आयुक्त पद रिक्त असल्याबाबत**

**(४६) २३०१२ (१६-०८-२०१६). श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील आदिवासी विकास विभागाच्या कार्यालयातील अप्पर आयुक्त पद मागील आठ महिन्यापासून रिक्त असून रुपये ७५० कोटी इतक्या रक्कमेच्या विनियोजनाचे काम ठप्प झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०८-११-२०१६) :** (१) हे खरे नाही.

दिनांक १/६/२०१६ पासुन नियमित अप्पर आयुक्त पद भरण्यात आलेले असून निधी विनियोजनाचे काम ठप्प झालेले नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा कारागृहातील कैद्याने पलायन केल्याबाबत**

**(४७) २३०६६ (२३-०८-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा कारागृहातील कैद्याने पलायन केल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दोषी कर्मचाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच, भविष्यात असे प्रकार टाळण्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-१०-२०१६) :** (१) होय.

(२) या प्रकरणी दोषी कर्मचाऱ्यावर शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली आहे.

(३) कारागृहाची सुरक्षाव्यवस्था मजबूत ठेवण्याच्या दृष्टीने कारागृहाच्या तटभिंतीला असलेल्या १३ पिलर्सला प्लास्टर करण्यात आले आहे. चार बॅरॅक्समध्ये संरक्षक भिंतीचे व स्वतंत्र मुलाखत कक्षाचे बांधकाम करण्यात आले आहे. कारागृहाच्या आतील बाजूस सात प्रखर विद्युत दिवे बसविणेत आले आहेत.

तसेच कारागृहात सुरक्षेच्या दृष्टीने वॉच टॉवर उभारणे, बॅरॅक्सच्या खिडक्या व दरवाजांना जाळ्या बसविणे, बाह्य भिंतीला प्लास्टर इ.बांधकाम, कारागृहाच्या आतील तटभिंतीलगत रात्री व दिवसा गस्त घालण्यासाठी रस्ता तयार करणे, कारागृहाच्या मुख्य तटभिंतीवर इलेक्ट्रीक फेन्सिंग बसविणे, कारगृहाच्या तटभिंतीची उंची एक मीटरने वाढविणे ह्या कामांबाबत प्रशासकीय कार्यवाही सुरु आहे.

(४) विलंब झालेला नसल्याने माहिती निरंक आहे.

---

**अकोला, वाशिम व बुलडाणा जिल्हयातील बेरोजगारांबाबत**

**(४८) २३२४९ (२४-०८-२०१६). श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला, वाशिम व बुलडाणा जिल्हयातील किती बेरोजगारांनी सेवायोजन कार्यालयात नोंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी किती बेरोजगारांना आतापर्यंत शासकीय नोकरी मिळवून देण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, उक्त जिल्हयातील बेरोजगारांना रोजगार मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (०३-११-२०१६) :** (१) ऑगस्ट, २०१६ अखेर पर्यंत अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रात नोंद केलेल्या बेरोजगार उमेदवारांचा नोंदणीपट अनुक्रमे ७१७५९, ३६४३२ व ८६०८० असा आहे.

(२) वर्ष २०१६ मध्ये ऑगस्ट, २०१६ पर्यंत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, बुलढाणा कार्यालयात नोंदणीकृत १००० उमेदवारांना शासकीय नोकरी प्राप्त झाली आहे. या कालावधीत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अकोला व वाशिम या कार्यालयातून शासकीय नोकरी प्राप्त झालेल्या उमेदवारांची संख्या निरंक आहे.

(३) अकोला, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यातील बेरोजगारांना रोजगार मिळावा या दृष्टीने या जिल्ह्यामध्ये खालील योजना शासनामार्फत राबविण्यात येत आहेत.

अ) रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम.

ब) रोजगार मेळावे.

क) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**थळ वायशेत (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील राष्ट्रीय कॅमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स कंपनीमध्ये वायुबाधेने कर्मचारी मृत्यूमखी पडल्याबाबत**

**(४९) ४४२२६ (१६-०८-२०१३). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय कॅमिकल्स ॲण्ड फर्टिलायझर्स कंपनी, थळ वायशेत (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील कर्मचारी एस.आर. शिपुरे हे कामावर असताना अमोनिया आणि अमाईड वायुच्या बाधेमुळे अत्यावस्थेत असताना त्यांना लाईफ टाईम हॉस्पिटल, पनवेल येथे २०११ मध्ये वा त्यादरम्यान उपचारासाठी दाखल केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री. एस.आर. शिपुरे अमाईडने बाधित असताना अमोनिया बाधित झाल्याचा अहवाल सादर करुन आर.सी.एफ. प्रशासनाने श्री. शिपुरे कुटूंबियांची दिशाभूल केल्याने त्यांना प्राणास मुकावे लागले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री. शिपुरे यांच्या मृत्यूची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्याचे योजिले आहे,

(५) श्री. एस.आर. शिपुरे यांच्या मृत्यू पश्चात त्यांच्या कुंटूबियांना सेवेत सामावून घेण्यात आले आहे काय,

(६) नसल्यास, सेवेत सामावून न घेण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी निलंगेकर-पाटील (२०-१०-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.
कै.एस.आर. शिपुरे यांचा दिनांक ७/१२/२००९ रोजी पोटॅशियम अमाईड असलेल्या अमोनिया (२० ग्रॅम/केजी अमोनिया) मुळे बाधा झाली होती. त्यांना कारखान्यातील ऑक्युपैशनल हेल्थ सेंटर येथे प्रथमोपचार देऊन नंतर आरसीएफ हॉस्पिटल कुरुळ येथे नेण्यात आले. दुसऱ्या दिवशी विशेष उपचारासाठी त्यांना सुराणा हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले. त्यांना नोकरीत हजर होण्यासाठी तंदुरुस्त आहेत असे प्रमाणित केल्यानंतर दिनांक २६/५/२०१० रोजी श्री. शिपुरे कामावर हजर झाले.

दिनांक २०/५/२०१३ रोजी श्री. शिपुरे यांचा लाईफ लाईन हॉस्पिटल, पनवेल येथे नैसर्गिकरित्या मृत्यू झाला असे दिनांक २०/५/२०१३ रोजी लाईफ लाईन हॉस्पिटल कडील अहवाल (Death Certificate) मध्ये देण्यात आले आहे.

(२) हे खरे नाही.

कै.एस.आर. शिपुरे यांना दिनांक ७/१२/२००९ रोजी पोटॅशियम अमाईड असलेल्या अमोनिया (२० ग्रॅम/केजी अमोनिया) मुळे बाधा झाली होती. असे आर. सी. एफ. ने अहवालामध्ये नमूद केले आहे. याबाबत आर. सी. एफ. प्रशासनाने संबंधित डॉक्टरांनाही माहिती दिलेली आहे. त्यामुळे कै.शिपुरे यांच्या कुंटूंबियांची दिशाभूल केली असे म्हणता येणार नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) नाही. मृत व्यक्तीच्या वारसांना कामावर घेण्याची योजना आर.सी.एफ. प्रशासनाची नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू पश्चात त्यांच्या कुटुंबियांना सेवेत सामावून घेण्यात आले नाही. तथापि, कै. शिपुरे यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांना रुपये ४८,२०,३५६.१२ इतकी एक रकमी ठोक रक्कम भरपाई म्हणून दिलेली आहे. त्या व्यतिरिक्त कै.शिपुरे यांना रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले असता त्यांच्या उपचाराचा खर्च रक्कम १२,७६,५७६.०० आर.सी.एफ. व्यवस्थापनातर्फे करण्यात आला आहे.

---

**प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासह दोन कर्मचा-यांना लाचलुचपत प्रतिबंधक अधिका-यांने केलेली अटक**

**(५०) ४९०४३ (०१-०७-२०१४). श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्राथमिक आरोग्य केंद्र, करुम (जि.अकोला) येथे कार्यरत असलेले श्री.बाळकृष्ण सिताराम रामचौरे, आरोग्य सहाय्यक यांचा निलंबन कालावधी नियमित करणेसाठी व पदोन्नतीसाठी त्यांच्याकडून अकोला जिल्हा परिषदेचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.प्रकाश देव व जिल्हा आरोग्य अधिकारी श्री.दिलीप पांडे, प्रशासकीय अधिकारी श्री.अप्पा निनाजी डामरे व आरोग्य विभागातील लिपिक पवन आगरकर यांनी ५० हजार रुपयांची मागणी केल्यामुळे नमूद अधिकारी व कर्मचा-यांना अटक करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, संबंधित अधिकारी व कर्मचा-यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०३-१०-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी आरोपी १) श्री.प्रकाश देव, जिल्हा परिषदेचे प्रभारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी, २) श्री.दिलीप पांडे, जिल्हा आरोग्य अधिकारी, ३) श्री.अप्पा निनाजी डामरे, प्रशासकीय अधिकारी व ४) श्री.पवन आगरकर, कनिष्ठ सहायक, आरोग्य विभाग, अकोला यांचेविरुध्द सिव्हील लाईन पोलीस स्टेशन, अकोला येथे लाचलुचपत प्रतिबंधक कायदा, १९८८ कलम ७, १०, १२, १३ (१) (ड) सह १३ (२) अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक ३०४०/२०१३ दाखल करण्यात आला याबाबत मा.विशेष न्यायालय, अकोला येथे दोषारोपपत्र दाखल केले असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच नमूद आरोपी लोकसेवकांना शासकीय सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.